विविध भाषांवर प्रभुत्व असलेले डॉ. भिमराव रामजी आंबेडकर

(प्रकाशित लोकनायक ८ जून २०१०; महानायक २,३ जुलै २०१०)

"मी चोवीस तास विद्येची पूजा करतो" असे डॉ. आंबेडकर म्हणत असत. त्यांच्या याच म्हणण्याचे उदाहरण म्हणजे त्यांना ज्ञात असलेल्या भाषा आणि त्यांचे त्या भाषांवर असणारे प्रभुत्व. लहानपणी शाळेत असताना त्यांना संस्कृत भाषा शिकण्याची खुप इच्छा होती. परंतु शाळेतील मास्तराने त्यांना ते अस्पृश्य असल्यामुळे संस्कृत शिकविण्याचे नाकारले आणि म्हणून त्यांना दुसरी भाषा पर्शियन ही शिकावी लागली. त्यांनी पर्शियन भाषा आत्मसात केली. त्यांना संस्कृत भाषेचा खूप अभिमान होता. मास्तराने भाषा शिकविली नाही म्हणून काही त्यांनी जिद्द सोडली नाही. स्वः प्रयत्नांतून त्यांनी संस्कृत भाषा खूप चांगल्या पद्धतीने अभ्यासली आणि संसकृत भाषेवर वर्चस्व निर्माण केले आणि ते संस्कृत भाषेचे विद्वान पंडीत झाले. 'The untouchable' आणि 'who were the shudras?' ही दोन पुस्तके डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कृतचे विद्वान असल्याचा पुरावा देतात. जो शोध, संशोधन हजारो ब्राह्मण करु शकले नाही ते बाबासाहेबांनी करुन दाखविला. संस्कृत ग्रंथाच्या शोधात अजूनपर्यंत एकही जात अभिमानी ब्राह्मण या दोन पुस्तकांचे उत्तर देऊ शकलेला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी संत कवींचा अभ्यास केलेली माणसे फारच थोडी असतील. मराठी संत कवींचा त्यांनी खोलवर अभ्यास केलेला होता. संस्कृत भाषाप्रमाणेच मराठी भाषेचाही त्यांना खूप अभिमान होता. ते कैक वर्षे बहिष्कृत भारत, जनता व मूकनायक या मराठी साप्ताहिकांचे संपादक होते. त्यांनी मराठीतही बरेच लेखन केलेले आहे. जनता या वृत्तपत्रात येणारे संपादकीय लेख हे त्यांच्या लेखणीतूनच उतरलेले होते. "बौद्ध पूजा पाठ" हे पुस्तक त्यांनी मराठीतूनच लिहिलेले होते. तसेच ते मराठीत चांगले व्याख्यानही देत होते.

"हिंदी" ही राज्यभाषा. हिंदी भाषेवरही त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी हिंदी भाषाही चांगल्याप्रकारे आत्मसात केलेली होती. ते हिंदीही चांगल्याप्रकारे बोलत असत. दिल्लीतमध्ये असताना तेथे हिंदी भाषेचा जास्त उपयोग होत असल्याने बाबासाहेब तेथील सर्वसामान्य लोकांबरोबर व काही भारताच्या विविध भागातून येणाऱ्या व्यक्तींबरोबर ते हिंदी भाषेतच बोलत असत. तसेच त्यांनी हिंदी भाषेतून भाषणेही केलेली आहेत.

भाषांवर प्रभुत्व असलेली डॉ. आंबेडकरांची आणखी एक भाषा म्हणजे पारसी. ते पारसी भाषासुद्धा बोलत असत. पारसी भाषा डॉ. आंबेडकरांना चांगल्याप्रकारे ज्ञात होती, याचे त्यांच्याच जीवनातील एक उदाहरण आहे. बडोदे सरकारची स्कॉलरशिप मिळाल्यानंतर त्यांनी विलायतेला जाऊन उच्च शिक्षण घेतले. तेथून परत आल्यावर स्कॉलरशिपच्या अटीप्रमाणे त्यांना बदोडे संस्थानात नोकरी करणे भाग पडले. परंतु बडोद्यास राहण्यासाठी त्यांना एकही घर मिळेना. हिंदु किंवा मुसलमान कोणीच त्यांना राहावयास जागा देईना. शेवटी त्यांनी एका धर्मशाळेत पारसी म्हणून रहावयाचे ठरविले. विलायतेहून परत आल्यावर ते दिसायला रुबाबदार व गोरेपान दिसत होते. त्यांनी "एलदजी सोराबजी" हे पारशी नाव धारण केले आणि पारशी लोकांबरोबर पारसी भाषेत संवाद करुन २ रुपये जागेचे भाडे या अटीवर त्यांना रहावयास जागा देण्याचे धर्मशाळेच्या रखवालदाराने कबूल केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तेथे पारशी म्हणून गुप्तपणे राहू लागले होते.

एकदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर अहमदाबादला गेले होते. तेथे त्यांनी चक्क गुजराती भाषेत सुस्पष्ट, भारदस्त असे व्याख्यान दिले. मुंबईमध्ये असताना ते गुजराती व्यक्तींबरोबर गुजराती भाषेत बोलत असत. गुजराती लोकांनाही आपले विचार समजावेत म्हणून त्यांनी गुजराती भाषासुद्धा आत्मसात केली होती.

उच्च शिक्षणासाठी डॉ. आंबेडकर परदेशात गेले होते. तेथे त्यांनी बुद्ध धम्माचा खूप अभ्यास केला. बुद्धधर्म काय आहे हे समजून घेण्यासाठी आणि बुद्धाच्या चरित्राने मनात उडविलेली खळबळ शमविण्यासाठी त्यांनी तेथे खूप वाचन केले होते. २५०० वर्षापुर्वी गौतम बुद्धाची भाषा "पाली" ही होती किंवा पाली ही भाषा त्याकाळी बोलली जात. ती त्या वेळेच्या जनतेची भाषा होती. गौतम बुद्ध पाली भाषेतूनच उपदेश करत असत. पाली ही बौद्ध धम्माची मुख्य भाषा होती व ती आजही आहे. गौतम बुद्धाचा धम्मोपदेश मुळतः पाली भाषेतच आहे. पाली भाषेचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन डॉ. भिमराव

आंबेडकरांनी पाली भाषेचा अभ्यास केला व ती आत्मसात केली आणि पाली भाषेवर प्रभुत्व निर्माण करुन वर्चस्व निर्माण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पाली भाषेचे विख्यात पंडीत होते ही गोष्ट आजही कित्येकांना माहिती नाही. प्रतिष्ठीत व्यक्तींबरोबरच सर्वसामान्य लोकांनीसुद्धा पाली भाषा शिकावी या हेतूनेच त्यांनी 'Pali Grammar' (पाली व्याकरण) या नावाचे पुस्तक लिहिले. पाली भाषेतील सर्वसामान्य वापरात येणारे शब्द व त्यांचे इंग्रजी अर्थ त्यांनी या पुस्तकात दिलेले आहेत. जसे इंग्रजी भाषा शिकण्यासाठी 'English Grammar' चा अभ्यास करावा लागतो, अगदी त्याच पद्धतीने पाली शिकण्यासाठी 'Pali Grammar'या पुस्तकाचा अभ्यास करावा लागतो. या पुस्तकात त्यांनी वर्णविचार, पाली शिकण्याचे भाषानियम व शब्दविचार दिलेले आहेत. पाली भाषेची बाराखडीही त्यांनी या पुस्तकात दिलेली आहे. तसेच पालीतून संवाद करण्यासाठी त्यांनी काही वाक्ये दिलेली आहेत.

उदा. तुला पाली माहिती आहे का ?
(पाली) : त्वं पालीभासं जानासि ?।
अशा पद्धतीचे अनेक वाक्ये त्यांनी सुबद्ध पद्धतीने मांडणी करुन दिलेली आहेत. तसेच "काळ" सुद्धा याच पुस्तकात दिलेले आहेत.

पाली भाषेतून कोणताही शब्द असो, त्याचा अर्थ का मिळणारच. कोणत्या पाली शब्दाचा अर्थ काय आहे हे शोधणे लोकांना कठीण जाऊ नये म्हणून बाबासाहेबांनी 'The Pali Dictonary'नावाचा एक स्वतंत्र असा पाली भाषेचा शब्दकोश नव्हे तर महाशब्दकोश त्यांनी लिहिला. या शब्दकोशात A ते Y पर्यंत म्हणजे अ ते य पर्यंत सर्व पाली शब्द दिलेले आहेत आणि प्रत्येक शब्दाचा अर्थ त्यापुढे दिलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाली भाषेवर असणारे अफाट संधोधन, वर्चस्व आणि प्रभुत्व याची साक्ष हा पाली शब्दकोशच देतो.

या दोन पुस्तकांबरोबरच त्यांनी "पाली-इंग्रजी-हिंदी-गुजराती" या नावाचा आणखी एक शब्दकोश लिहिलेला आहे. त्यांचे पाली भाषेवरचे हे अफाट लेखन आहे. 'Pali Grammar; The Pali Dictonary; Pali into english-marathi-hindi-Gujrati' ही तीन पुस्तके पाहिल्यानंतर त्यांचे पाली भाषेवर किती मोठे प्रचंड वर्चस्व होते हे चटकन लक्षात येईल. पाली भाषा कालबाह्य होऊ नये म्हणून त्यांनी दूरदृष्टी ठेवून ती आत्मसात केली व भाषेसंबंधी कोणालाही अडचण निर्माण होऊ नये यासाठी त्यांनी पाली भाषेतच विद्वानांना तोंडात बोटे घालावी लागतील अशा विद्वत्ता असलेली पालीवरील ग्रंथ त्यांनी लिहिले.

जागतीक उच्चतेची आणि जगात सर्वत्र ज्ञात असलेली भाषा इंग्रजी. इंग्रजी भाषेबद्दलसुद्धा डॉ. आंबेडकरांना खुप अभिमान होता. त्यांचे वडील रामजीबाबा यांनी भिमराव लहान असतानाच त्यांना इंग्रजी शिकविण्यास सुरुवात केली होती. रामजीबाबा हावर्डची पुस्तके त्यांच्याकडून तोंडपाठ करुन घेत असत. त्याचप्रमाणे तर्खडकरांचे भाषांतर पाठमालेची तीन पुस्तकेही भिमरावांकडून तोंडपाठ करुन घेतली होती. मराठी भाषेतील शब्दांना योग्य प्रतिशब्द शोधून काढण्यास व त्यांचा योग्य ठिकाणी उपयोग करण्यासही रामजीबाबांनीच त्यांना शिकविले होते. पण योग्य शब्दांचा तोल तोलून उपयोग कसा करावा हे भिमरावांना कोणा मास्तराने शिकविले नाही; शिकविले ते त्यांच्या वडिलांनीच. त्याचप्रमाणे इंग्रजी वाक्यप्रचार व योग्य भाषाशैली कशी वापरावी हे सुद्धा त्यांच्या वडिलांनीच त्यांना शिकविले होते. अखंड परिश्रमामुळे डॉ. भिमराव आंबेडकरांनी इंग्रजी भाषवर वर्चस्व निर्माण केले होते. भारतातच त्यांनी इंग्रजी भाषेत बी.ए. केले होते. परदेशात शिक्षण घेत असताना त्यांनी इंग्रजी भाषेतून अनेक प्रबंध लिहिले. 'The Evolution of provinical finance in British india' या त्यांनी लिहिलेल्या प्रबंधावर त्यांना 'Doctor of Philosophy' ची उपाधी कोलंबिया या विद्यापीठाने दिली होती.

इंग्रजी भाषेसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "I love the English language, even Englishmen have admored mz English prose." (मी इंग्रजी भाषेवर प्रेम करतो, इंग्रजांनीही माझ्या इंग्रजी-गद्याची (गद्यभाषेची) प्रसंशा केली आहे.)

डॉ. भिमराव आंबेडकरांच्या इंग्रजी भाषेबद्दल Edward Thomson (एडवर्ड थॉमसन) लिहितात,

"Ambedkar is master in his own very vigrous and individual fashion of the english language. He is a most exhilarating polemist, utterly fearless with a wide command of the unexpected and devastating illustration-historical or otherwise and his energy flies so switty that it produces by the way most effective results... If any thing by Ambedkar comes your way, read it and you will understand why he often makes orthodox Hindus hopping mad. He is one of the dozen most astonishing men in india."

(आंबेडकर, आपल्या वेगळ्या व्यक्तीमत्वाचे, इंग्रजी भाषेचे, एक ताकदवान असे श्रेष्ठ आहेत. ते अत्यंत विवादी आनंदी, सजीव आहेत. ते निर्भीड आहेत. त्यांनी दिलेली उदाहरणे ऐतिहासिक असो कि अन्य असो, सर्वांवर अनपेक्षित आणि विध्वंसक प्रभाव आहे, त्याचे तेज इतक्या वेगाने गतीमान होतात की, त्यातून जाता जाता प्रभावी परिणाम जन्म घेऊ शकतात. जर तुम्हाला आंबेडकरांची कोणतीही रचना हाती मिळाली तर ती वाचा आणि मग तुम्हाला समजेल की ती रचना रुढीवादी हिंदुंना वेड का लावते. आंबेडकर भारतातील अत्यंत आश्चर्यजनक एक डझन पुरुषांमधून एक आहेत.)

कोलंबिया युनिव्हर्सिटीतील प्रो. सेलिग्मन म्हणतात, "भीमराव हिंदी विद्यार्थ्यांतच नव्हे तर अमेरिकन विद्यार्थ्यांतही श्रेष्ठ आहेत."

डॉ. भिमरावांनी "हिंदुस्थानातील जाती-त्यांची घटना, उत्पत्ती आणि वाढ" हा निबंध तयार केला होता. कोलंबिया विद्यापिठातील समजाशास्त्राचे प्रोफेसर डॉ. ए. ए. गोल्डनवायजर, यांच्या अंथ्रॉपॉलॉजी सेमिनारपुढे (विद्यार्थीसंघापुढे) ता. ९ मे १९१६ रोजी हा प्रबंध भिमरावांनी वाचला. या निबंधातील विचारसरणी, विषय मांडण्याची धाटणी आणि जुन्या विषयावर नवा शोधप्रकाश टाकण्याची हातोटी पाहून डॉ. गोल्डनवायजर व सर्व विद्यार्थीसंघ भिमरावांवर अत्यंत खूष झाला. या निबंधातील इंग्रजी भाषावैभव इतक्या उच्च दर्जाचे होते की, अमेरिकेत अभिजात वाङ्मय ज्या ग्रंथात असे त्या ग्रंथांचा नामनिर्देश करणाऱ्या एका संस्थेने भिमरावांच्या या निबंधाचा उल्लेख केलेला होता.

इकतेच नव्हे, तर त्यांचे इंग्रजी भाषेवरही असणारे प्रचंड वर्चस्व किती होते याची कल्पना करणेसुद्धा अशक्य आहे. ग्रंथलेखनासाठी त्यांनी वापरलेले इंग्रजी शब्द कित्येक शब्दकोश पालथे घातले तरी त्यात ते शब्द सापडत नाहीत. त्यांच्या इंग्रजी शब्दांची वाक्यरचना तर खूपच निराळी आहे. त्यांनी लिहिलेल्या मोठ-मोठ्या ग्रंथात इतके लेखन आहे की त्या लिखाणाचे स्पष्टीकरण करावयाचे असल्यास त्यावर आणखी पुस्तकेसुद्धा लिहिली जाऊ शकतील. लिखाणात एक-दोन वाक्यरचनेतसुद्धा खूप मोठा अर्थ भरलेला असे. त्यांच्या याच प्रभुत्वामुळे ते कोलंबिया विद्यापीठातील एक आदर्श विद्यार्थी ठरले. डॉ. आंबेडकरांची भाषाशैली इतकी अफाट होती की ती न समजल्यामुळे कित्येकांना तोंडात बोटे टाकावी लागत असे. इंग्रजी भाषेतूनच त्यांचे प्रभावी भाषण ऐकून तत्कालीन ब्रिटीशसुद्धा आश्चर्यचकीत होत असत. इंग्रजांनी सुद्धा उत्कृष्ट इंग्रजी भाषा शिकायची असल्यास डॉ. आंबेडकरांकडून ती शिकावी असे तत्कालीन इंग्रजांना वाटत होते. तसेच इंग्रजी भाषेनेसुद्धा बाबासाहेबांचे आभार मानले असतील. इतकेच नाही तर त्यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात 'The Buddha and his Dhmma' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाचे स्पष्टीकरण करण्याचा आपण विचार जरी केला तर त्यावर आणखी त्याच आकाराची किती पुस्तके निघतील हे काही सांगता येण्यासारखे नाही.

याचबरोबर जर्मन भाषाही त्यांना अवगत होती. त्यांनी लिहिलेल्या 'The Problem of Rupees' या प्रबंधावरील परीक्षकांच्या समितीचा निर्णय जाहीर होण्यास ५-६ महिने लागणार होते. या काळाचा कसा उपयोग करावा हा त्यांच्यापुढे प्रश्न होता. विचारांती त्यांनी असे ठरविले की, जर्मनीतील बॉन विश्वविद्यालयात एखाद्या आर्थिक विषयावर संशोधात्मक लिखाण करुन त्या विश्वविद्यालयाची डॉक्टरेट मिळवावी. पण या बॉन युनिव्हर्सिटीत जे काही लिहावयाचे होते ते

जर्मन भाषेत. म्हणून डॉ. आंबेडकरांची जर्मन भाषेचा अभ्यास सुरु केला होता. परदेशी वातावरणात असताना ते फ्रेंच भाषा सुद्धा शिकले होते. शिकण्यास सर्वात जास्त अवघड भाषा, ती म्हणजे कन्नड. त्यांना कन्नड भाषासुद्धा येत होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषांचे चाहते होते. संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी, पर्शियन, पाली, पारशी, गुजराती, कन्नड, जर्मन आणि फ्रेंच अशा कित्येक भाषा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अवगत होत्या; या भाषा त्यांनी आत्मसात केल्या होत्या. डॉ. आंबेडकर हे भाषाशैलीचे गुरु होते. जवळजवळ ११ भाषांवर त्यांनी वर्चस्व निर्माण केले होते. भाषांचे ते पंडीत होते. भारतच काय तर संपूर्ण विश्वात अनेक भाषा आत्मसात करणारा, भाषाशैलीचा गुरु किंवा भाषांचाही गुरु, भाषांवर प्रभुत्व गाजवून वर्चस्व निर्माण करणारा डॉ. भिमराव आंबेडकरांसारखा दुसरा कुणी असू शकेल काय ?

राजरत्न ठोसर